Outward No. CDF/....116../2026
Office of Chief Seed Production Officer
CDF, Wani Rambhapur
Dated...11/05/2026.

# मध्यवर्ती प्रात्यक्षिक प्रक्षेत्र, वणी रंभापूर

## निविदा सूचना

म. प्रा. प्र. कार्यालय अंतर्गत विविध विभागातील प्रक्षेत्रातील पेरणी योग्य जमिन तयार करण्यासाठी काढलेल्या काटेरी झुडपाचे राहिलेले खोड, मुळे व पालव्या लहान पोकल्याण मशीनद्वारे ( Mini Poclane Machine) काढण्याकरिता परवानाधारक निविदधारक/ कंत्राटदार यांचे कडून खालील तपशिलाप्रमाणे निविदा मागविण्यात येत आहे.

| अ क्र | कामाचे विवरण | कामाचा प्रकार व परिमाण | या मशीनद्वारे करावयाचे कामाचे दर रु. प्रति तास GST |
|---|---|---|---|
| १ | लहान पोकल्यान मशीन (By Mini Poclane/Excavator) पुरविणेबाबत | विभागाचे प्रक्षेत्रातील, काटेरी झुडपाचे जमिन तयार करण्यासाठी काढलेल्या काटेरी झुडपाचे, राहिलेले खोड, मुळे व पालव्या लहान पोकल्याण मशीनद्वारे (By Mini Poclane/Excavator machine) काढणे<br>**परिमाण - ३.९ मी x १.५ मी x २.४ मी**<br>**बकेट क्षमता – ०.०३ मी**<br>**स्विंग त्रिज्या – १.७ मी** |  |

उपरोक्त कामाचे दर दिनांक १८/०५/२०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करण्यात यावे. कामाचे अटी व शर्ती खालील प्रमाणे आहेत.

### अटी व शर्ती

१. निविदा सादर करतांना निविदा पाकिटावर मध्यवर्ती प्रात्यक्षिक प्रक्षेत्र, वणी रंभापूर अंतर्गत विभागाचे प्रक्षेत्रातील, काटेरी झुडपाचे जमिनी लागत असलेले धसकटे लहान पोकल्यान मशीनने (By Mini Poclane/Excavator machine) कामे करण्याचे करण्याबाबत असा स्पठ उल्लेख असावा व दिनांक १८/०५/२०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत निविदा सादर करण्यात याव्या.

२. **निविदा सोबत देण्यात आलेल्या छायाचित्रातील कंपनीच्या पोकल्याण मशीन/यंत्र पुरविण्यात येऊन विभागावरील कामे करण्यात यावी.**

३. निविदामधील संबंधित कामे करण्याचे दर नियमाप्रमाणे सर्व करासह नमूद करण्यात यावे तसेच त्या कराचा विहित मुदतीमध्ये भरणा करण्याची संपूर्ण जबाबदारी संबधित निविदाधारकाची राहील. करा सबंधी कोणतीही तक्रार असल्यास हे कार्यालय/विद्यापीठ जबाबदार राहणार नाही.

४. निविदाधारकाने प्रक्षेत्रावरील विभागासंबंधित कामे करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या पुरुष मजुरांचे व्यवस्थापनाची संपूर्ण जबाबदारी संबंधित कंत्राटदाराची राहील.

५. प्रक्षेत्राचे विभागावर कामे तसेच इतर विभाग संबंधित कामे करतेवेळी कुठलीही दुर्घटना/अपघात/जीवितहानी झाल्यास हे कार्यालय किवा कोणताही कर्मचारी/अधिकारी किवा विद्यापीठ जबाबदार राहणार नाही. याची सर्वस्वी जबाबदारी सबंधित कंत्राटदाराची राहील.

६. विभागावर देण्यात आलेले कामे पूर्ण करण्यात यावे. कामाबाबत विभागावरून तक्रार आल्यास किवा काम अर्धवट राहिल्यास सदर कामाचे देयक काढण्यात येणार नाही.

७. विद्यापीठ प्रशासनाने वेळोवेळी निर्देशीत केलेल्या नियमांचे पालन करणे संबधित निविदा धारकांना बंधनकारक राहील. तसेच देयक सादर करतेवेळी बँक खाते बाबतची संपूर्ण माहिती सादर करावी .

८. या कार्यालया तर्फे सबंधित कामे करण्याकरिता कोणत्याही प्रकारचे साहित्य पुरविण्यात येणार नाही. सबंधित काम करण्याकरिता आवश्यक साहित्य उपलब्ध करून देण्याची संपूर्ण जबाबदारी सबंधित निविदा धारकांनाची राहील.

९. निविदा धारकास काम पूर्ण व विहित वेळेत केल्यावर तसेच संबधित विभागाचे प्रभारी अधिकारी यांनी काम समाधानकारक झाल्याचे प्रमाणित केल्यानंतरच कामाचे देयक पारित करण्यात येईल .

१०. प्रक्षेत्राचे विभागावर कामे तसेच इतर विभाग संबधित कामे करीत असतांना कोणताही वाद विवाद निर्माण झाल्यास सदर वाद विवाद विद्यापीठ विधी विभागाचे अधिकारी/मा. मुख्य बिजोत्पादन अधिकारी यांचे समक्ष मिटविला जाईलव अंतिम निर्णय मुख्य बिजोत्पादन अधिकारी, वणी रंभापुर यांचा राहील आणि तो सर्वांना मान्य करणे बंधनकारक राहील. .

११. विभागावर प्रक्षेत्रातील कामा करिता पुरविण्यात आलेले यंत्र चांगल्या स्थितीत असावे व सोबत असलेले अवजारे/यंत्र चांगल्या दर्जाचे असणे आवश्यक राहील. तसेच सर्व कामे हि कार्यालयीन वेळेतच करून घेण्यात येईल.

१२. ज्या विभागावर काम उपलब्ध असेल त्याच विभागावर काम करावे लागेल.

१३. विभागावर देण्यात आलेले काम पूर्ण करण्यात यावे. अर्धवट काम सोडून गेल्यास सदर कामाचे देयक काढण्यात येणार नाही.

१४. लहान पोकल्यान मशीनने कामे करत असतांना कोणत्याही प्रकारचे नुकसान जीवितहानी व अपघातास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही. त्याची सर्वस्वी जबाबदारी संबधीत निविदाधाराकाची राहील. कामे करत असतांना विद्यापीठाच्या मालमत्तेचे कोणत्याही प्रकारचे नुकसान होणार नाही याची जबाबदारी घ्यावी. होणाऱ्या नुकसानीस सर्वस्वी कंनिविदाधारास जबाबदार धरण्यात येईल व नुकसान भरपाईची वसुली करून घेण्यात येईल.

१५. कार्यलयीन पद्धती प्रमाणे समाधानकारक कामाचे देयक अकोला कार्यालयाकडून मंजूर झाल्यावरच आपल्याला कामचा मोबदला/ देयक खर्च दिले जाईल त्यामुळे वरवर विचारणा करू नये.

१६. सदर कामे कार्यालयीन दैनदिन स्वरुपाची असतील व शासकीय नियमाप्रमाणे काम असेल. .

१७. सेवा पुरविणाऱ्या कंत्राटदारास शासनाच्या निर्देशानुसार सर्व कराच भरणा कराची जबाबदारी कंत्राटदारांची राहील याबाबतील काही तंटा निर्माण झाल्यास कार्यालय हस्तक्षेप करणार नाहीत व कोणतीही या कार्यालयाचा अधिकारी अथवा विद्यापीठाची जबाबदार राहणार नाही.

१८. मशीनवर काम करतेवेळी इजा, अपघात अथवा मूत्यू स्भाविल्यास किवा नैसर्गिक आपत्ती उदाप्राणी आणि वाढळामुळे ,मशिनरी ,पाऊस भूकंप ,विज . इजा अपघात अथवा मूत्यू संभविल्यास त्याची सर्व भरपाई आणि इतर कायदेशीर जबाबदारी कंत्राटदाराची राहील याचा या कार्यालयाशी अथवा विद्यापीठाशी कुठल्याही प्रकारचा संबंध राहणार नाही.

१९. मशीनद्वारे करण्याचे काम सब कॉन्टॅक्ट/कंपनी किंवा इतर व्यक्तींना देता येणार नाही तसे केल्याचे निदर्शनास आल्यास संबंधितांचा करार रद्द करण्यात येईल आणि त्यानंतर कार्यालयाचा तसेच विद्यापीठच्या कोणत्याही प्रकियेत संबंधित कंत्राटदारास भाग घेता येणार नाही.

२०. कंत्राटदार यांनी विभागावर काम करिता असतांना वस्तु व सेवा कर (GST) २ % व आयकर टीडीएस २ % हे देयक रक्कमेवर कपात करण्यात येईल व संबंधित कंत्राटदारास सदर कर कपातीचा त्रैमासिक परतावा दाखल (quarterly return) करून सदर कराचा परतावा मिळवता येईल.

२१. कामाचा आदेश मिळालेल्या कंत्राटदारास प्रक्षेत्रावर प्रत्यक्ष काम सुरु असतांना काम सुरळीत चालण्याचे दृष्टीने कंत्राटदार स्वत; अथवा पूर्णवेळ पर्यवेक्षक नेमून कामाचा सतत पाठपुरावा व देखरेख करणे बंधनकारक राहील. सुरळीत व वेळेत काम पूर्ण करण्याची संपूर्ण जबाबदारी हि कंत्राटदाराची राहील.

२२. निविधा द्वारे कामाचे दर सादर करीत असतांना GST सर्व करासह सादर करावे

२३. निविदा प्रक्रियेतील वरील नमूद सर्व अटी व शर्ती मान्य असलेल्या कंत्राटदारयांनी निविदा सादर कराव्या.

मुख्य बिजोत्पादन अधिकारी
मा.प्रा.प्र. वणी रंभापुर

**प्रतिलिपी माहितीस व कार्यवाहीस:**

ग्रामपंचायत कार्यालय वणी रंभापुर(राजापूर)/पैलपाडा/अन्वी/मिर्झापुर/कोठारी(ढगा)/तामशी/काटेपुर्णा/तानखेड/बोरगाव